# "माझा गाव, सुंदर गाव, समृद्ध गाव अभियान"

## परिपत्रक

**प्रस्तावना -**

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 साली अस्तित्वात आला तसेच पंचायत समिती व जिल्हा परिषद अधिनियम 1961 साली अस्तित्वात आला. या दोन्ही कायद्यानुसार अनुक्रमे ग्राम पंचायती आणि जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची स्थापना झाली. राज्यातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून या त्रिस्तरीय पंचायती राज संस्था कार्यरत आहेत. स्थानिक प्रश्न / समस्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून व लोकसहभागातून सोडविल्यास त्या त्या ठिकाणचा सर्वांगीण विकास होऊ शकतो; हे या संस्थांनी सिद्ध करून दाखवले आहे.

विकास म्हणजे केवळ रस्ते व इमारती बांधकाम करणे नव्हे. शाश्वत व सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर जनता, जनावरे, जल, जमीन, जंगल या पाचही नैसर्गिक घटकांचा अर्थात '5ज' चा विकास करावा लागेल. त्यातूनच ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावेल, त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन क्रयशक्ती सुधारेल व त्यातून मानव विकास निर्देशांकात सुद्धा वाढ होईल.

**अभियानाचे ध्येय व उद्दिष्टे -**

शाश्वत व सर्वंकष विकासाचे हेच ध्येय समोर ठेवून जिल्हा परिषद, बीड "माझा गाव, सुंदर गाव, समृद्ध गाव" हे महत्त्वाकांक्षी अभियान हाती घेत आहे. सदर अभियान 1 मे महाराष्ट्र दिनापासून ते 30 जून 2022 या दोन महिन्यांच्या कालावधीत हाती घेतले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील भौतिक सुविधांचा विकास, जलसंधारणाचे उपाय, जमिनीचा पोत सुधारण्याच्या उपाययोजना, महिला व बालकांचा विकास, वृक्ष लागवडीतून पर्यावरण संवर्धन, शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात वाढ करणे व त्यांचे जीवनमान उंचावणे, पशुधनाचा विकास करणे, गाव स्वच्छता व समृद्धी, नागरिकांचे आरोग्य सुधारणे इ. बाबी हाती घेतल्या आहेत. **त्यासाठी एक सर्वंकष आराखडा तयार केला असून त्याअंतर्गत गावठाण अंतर्गत करावयाची कामे गावठाणाच्या बाहेर करावयाची कामे व प्रशासकीय कामे अशा तीन प्रकारात आराखड्याची विभागणी करण्यात आली आहे.** सदरचा आराखडा या पत्रासोबत देण्यात येत आहे. या अभियानाची अंमलबजावणी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक प्रशासन यांच्या उत्तम समन्वयातून करणे अपेक्षित आहे.

**सरपंच कार्यशाळा -**

सदर अभियानाची पूर्वतयारी म्हणून आराखड्याच्या अंतर्गत करावयाची कामे, त्यासाठी लागणारा निधी याबाबत प्रत्येक तालुक्यात सरपंच कार्यशाळा घेण्यात आल्या असून या कार्यशाळांच्या माध्यमातून सरपंचांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सरपंच हा खऱ्या अर्थाने 'गावचा राजा' असून त्याने एखाद्या लोकाभिमुख राजाप्रमाणे कारभार करून आपल्या गावचा विकास करावा असे आवाहन त्यांना या कार्यशाळांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या आवाहनातून त्यांचा आत्मविश्वास व कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आहे.

**अभियानाची अंमलबजावणी -**

सदरचे अभियान दि. 1 मे 2022 ते 30 जून 2022 या दोन महिन्यांच्या कालावधीत राबवायचे आहे. आराखड्यातील प्रत्येक काम करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाची आहे व त्यासाठी निधी कोणत्या मार्गाने/योजनेतून उपलब्ध होणार आहे याबाबत आराखड्यात सविस्तर माहिती देण्यात आली आहे. जिल्हा परिषद अधिनस्त सर्व विभाग व सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनी आपले विषयाशी संबंधित सर्व कामांना तांत्रिक मार्गदर्शन करावयाचे आहे.

**मार्गदर्शन व पर्यवेक्षणासाठी समन्वय समिती** -

- **गाव पातळीवरील समन्वय समिती** -

सदर अभियानातील कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक सल्ला देणे, देखरेख ठेवणे, पर्यवेक्षण करणे या कामासाठी **गाव पातळीवर** गाव विकास व समन्वय समिती स्थापन करण्यात यावी.

**गाव विकास व समन्वय समितीची रचना**

गावातील सर्वमान्य व्यक्ती - **अध्यक्ष**

सरपंच - **सहअध्यक्ष**

उपसरपंच - **सदस्य**

दोन ग्रामपंचायत सदस्य (पैकी एक महिला) - **सदस्य**

गावाचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष - **सदस्य**

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष - **सदस्य**

पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक - **सदस्य**

वैद्यकीय अधिकारी/आरोग्य सेवक/आरोग्य सेविक (सर्व) - **सदस्य**

मुख्याध्यापक (सर्व) - **सदस्य**

अंगणवाडी सेविका (सर्व) - **सदस्य**

बचत गटाचे ग्रामसंघ अध्यक्ष/सचिव - **सदस्य**

संगणक परिचालक - **सदस्य**

ग्रामरोजगार सेवक - **सदस्य**

संबंधित गावच्या जलजीवन मिशन समितीचे सदस्य - **सदस्य**

कनिष्ठ अभियंता बांधकाम/ ग्रा.पा.पु./ल. पा. - **सदस्य**

MREGS चे पॅनल तांत्रिक अधिकारी - **सदस्य**

जलसुरक्षक - **सदस्य**

तालुकास्तरावरील पालक अधिकारी - **निमंत्रीत सदस्य**

तलाठी - **निमंत्रीत सदस्य**

कृषी सहाय्यक - **निमंत्रीत सदस्य**

ग्रामसेवक - **सदस्य सचिव**



**अध्यक्ष/सहअध्यक्ष यांची कार्ये व अधिकार -**

अभियान कालावधीत दर 15 दिवसांनी समितीची बैठक घेऊन प्रत्येक विभागांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेणे. पुढील 15 दिवसांच्या कामकाजाचे नियोजन करणे. सुरू असलेल्या कामकाजास गती देऊन सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करणे. काम पूर्ण करण्यात येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करणे.

**सदस्य सचिवाची कार्ये -**

गाव विकास व समन्वय समितीचा ग्रामसेवक पदसिद्ध सचिव असेल. दर 15 दिवसांनी समितीची बैठक बोलाविण्याची व सदस्यांना पत्रव्यवहार करण्याची जबाबदारी ग्रामसेवकाची असेल. समितीच्या सभांचे इतिवृत्त ग्रामसेवकांने लिहावे. तसेच 'माझा गाव, सुंदर गाव, समृद्ध गाव' या अभियानाच्या आराखड्यातील पंचायत विभागाशी निगडीत सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याची कार्यवाही करणे. (कर वसुली, 15% खर्च, 10% खर्च, 5% खर्च, ग्रामपंचायतीचे अभिलेखे अद्ययावत करणे इ.) तसेच ग्रामपंचायतींनी करायची अंतर्गत कामे व गावठाणाबाहेरील कामे व प्रशासकीय कामे पूर्ण करण्याची जबाबदारी ग्रामसेवकांची असेल.

**अंगणवाडी सेविका -**

गावातील SAM/MAM बालकांची संख्या शून्यावर आणणे. अंगणवाडीत डिजिटल वजन काटा उपलब्ध करणे. उंची मोजण्याची पट्टी उपलब्ध करणे. अंगणवाडीतील सर्व रजिस्टर व अभिलेखे अद्यावत करणे. SAM/MAM बालकांची संख्या असलेल्या अंगणवाडी पोषण पंधरवडा साजरा करून कुपोषण दूर करण्याचा प्रयत्न करणे. लसीकरण कार्यक्रमास मदत करणे. सॅनिटरी नॅपकिन ग्रामपंचायतीने उपलब्ध केल्यावर त्याच्या वितरणात सहकार्य करणे. माझी कन्या भाग्यश्री योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची खाती उघडणे. सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत लाभार्थी खाते उघडणे. अंगणवाडी परिसरात परसबाग लागवड करणे.

**आरोग्य सेवक/सेविका -**

प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्रातील अभिलेखे अद्यावत करणे. अभियान काळात आवश्यकता भासल्यास विशेष लसीकरण मोहीम हाती घेणे. मुलीच्या जन्माचे स्वागत करणे.

**पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक -**

जनावरांचे लसीकरण करणे. पशुवैद्यकीय दवाखान्यातील सर्व दप्तर अद्यावत करणे. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी घेऊन शेतकऱ्यांना गोपालन, महिषपालन, शेळीपालन, कुकुट पालन इत्यादीसाठी प्रोत्साहित करणे. पशुसंवर्धन विभागाच्या सर्व योजना पशुपालक व शेतकऱ्यापर्यंत पोहोचविणे.

**शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष -**

शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी अभियान काळात गावातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांची बैठक घेऊन उद्दिष्ट प्रमाणे शालेय कामकाज करणे साठी धोरण ठरवावे व पाठपुरावा करावा.

**मुख्याध्यापक -**

सर्व मुख्याध्यापकांनी शालेय अभिलेखे, शालेय पोषण आहाराचे अभिलेखे, हंगामी वस्तीगृहाचे अभिलेखे अद्ययावत करावेत. लोकसहभागातून शाळेची रंगरंगोटी करावी तसेच बाला प्रकल्पाबाबत आढावा घेऊन त्यास गती द्यावी. 100% विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करून ऑनलाइन करण्यात यावेत.

**तंटामुक्त समितीचे अध्यक्ष -**

गावातील सर्व प्रकारचे तंटे तडजोडीच्या माध्यमातून व सामंजस्याच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रयत्न करणे तसेच गावातील एखाद्या कामाबाबत तक्रार उत्पन्न झाल्यास त्याचे निराकरण करणे.

**ग्रामरोजगार सेवक -**

अभियान काळात नरेगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेणे उदा. गावठाण वृक्ष लागवड, बांधावरची वृक्ष लागवड, तुती लागवड, ग्रामपंचायत भवन, शोषखड्डे, मैदान तयार करणे, पुनर्भरण कामे, स्मशानभूमी, कंपोस्ट खत निर्मिती, गायगोठे, CCT, डीप CCT, नाला खोलीकरण व सरळीकरण, LBS, बांधबंधिस्ती, शेततळी, शेतरस्ते, शिवरस्ते, पाणंदरस्ते, फळबाग लागवड इत्यादी सदर कामांची हजेरीपत्रके भरणे, कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे. MREGS अंतर्गत सामाजिक लेखा परीक्षण करून घेणे. मजुरांना वेळेवर मजुरी मिळणेसाठी हजेरी पत्रके त्वरित मंजुरीसाठी सादर करणे.

**पॅनल तांत्रिक अधिकारी -**

नरेगा अंतर्गत नेमून दिलेल्या कामांची मोजमापे वेळेत घेणे. नरेगा कामांना तांत्रिक सल्ला/मार्गदर्शन करणे. कामांस प्रत्यक्ष भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

**तलाठी -**

गावठाण बाहेरील कामांना भेटी देणे. शेतरस्ते, पाणंदरस्ते, शिवरस्ते यांबाबत येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी कायदेशीर उपाययोजना करणे. नरेगा अंतर्गत सुरू असलेल्या कामांबाबत तक्रार उद्भवल्यास त्याच्या निराकरणासाठी प्रयत्न करणे.

**कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक व विस्तार अधिकारी (कृषी) -**

फळबाग लागवड, कांदा चाळ, शेतीपूरक व्यवसाय, पौष्टिक गवत लागवड, जमिनीचे पोत सुधारण्याचे उपाय, वृक्षलागवड, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, शेततळी, CCT, डीप CCT, मा.ना.बा., बांधबंधिस्ती, बायोगॅस, तुती लागवड, बीजोत्पादन, गटशेती इत्यादी कामे हाती घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे. सदर कामकाजाला तांत्रिक सल्ला पुरविणे, देखरेख व नियंत्रण ठेवणे.

**कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (बां.) -**

अनघड दगडी बांध, शेतरस्ते, शिवरस्ते, पाणंदरस्ते इत्यादी बाबत तांत्रिक सल्ला, मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे.

**कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (ल.पा.) -**

नाला खोलीकरण, सरळीकरण कामे हाती घेणे, सिमेंट नाला बांध, पाझर तलाव दुरुस्ती इत्यादी कामांना भेटी देऊन तांत्रिक सल्ला, मार्गदर्शन, नियंत्रण व पर्यवेक्षण करणे.

**कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (ग्रा.पा.पु.)/जलजीवन समिती -**

जलजीवन मिशन अंतर्गत सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करणे. जल पुनर्भरणच्या कामांना भेटी, तांत्रिक सल्ला, मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे, RO प्रणालीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

**आरोग्य सेवक, जलसुरक्षक -**

पाणी नमुने तपासणी, पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, TCL चा वापर यांवर सनियंत्रण करणे.

ग्राम विकास व समन्वय समितीने दर पंधरा दिवसांनी बैठक घेऊन अभियानाच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करावी, आढावा घ्यावा, तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन याबाबत विचारविनिमय करण्यात यावा.

**तालुका स्तरावरुन पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती -**

पंचायत समिती स्तरावरून सदर अभियानाची अंमलबजावणी, देखरेख, सनियंत्रण व समन्वयासाठी अभियानात सहभाग घेतलेल्या प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एका पालक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. सदर पालक अधिकारी हे विस्तार अधिकारी दर्जाचे अधिकारी असतील. पालक अधिकारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या गावास समक्ष भेट द्यावी व अभियानाच्या अंमलबजावणीस गती द्यावी.

❖ **तालुका पातळीवरील समन्वय समिती -**

सदर अभियानातील कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी आढावा घेणे, प्रशासकीय व तांत्रिक मार्गदर्शन करणे. प्रत्येक विभागाच्या कामकाजाचे परीक्षण करणे. दर 15 दिवसांनी बैठक घेऊन मागील 15 दिवसातील कामकाजाचा आढावा घेणे व पुढील 15 दिवसांच्या कामकाजाचे नियोजन करण्याची जबाबदारी या समितीची असेल.

**<u>तालुकास्तरीय विकास व समन्वय समितीची रचना</u>**

गटविकास अधिकारी - **अध्यक्ष**

सर्व विस्तार अधिकारी (पं.) - **सदस्य**

उपअभियंता (बां.) - **सदस्य**

उपअभियंता (ल.पा.) - **सदस्य**

उपअभियंता (ग्रा.पा.पु.) - **सदस्य**

तालुका आरोग्य अधिकारी - **सदस्य**

गटशिक्षणाधिकारी - **सदस्य**

एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी - **सदस्य**

सर्व कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) - **सदस्य**

तालुक्यातील निवडक पाच सरपंच (जिल्हास्तरावरून निवड केलेले) - **सदस्य**

सर्व RHE (घरकुल) - **सदस्य**

APO (MREGS) - **सदस्य**

BRC व CRC (स्वच्छ भारत मिशन) - **सदस्य**

BM (आपले सरकार सेवा केंद्र) - **सदस्य**

BMM (MSRLM) - **सदस्य**

RGSA अभियंता व ऑपरेटर - **सदस्य**

तालुका कृषी अधिकारी - **निमंत्रित सदस्य**

वनक्षेत्रपाल - **निमंत्रित सदस्य**

तालुकास्तरीय पालक अधिकारी – **सदस्य**

सहाय्यक गटविकास अधिकारी - **सदस्य सचिव**




सदर समितीची बैठक दर 15 दिवसांतून आयोजित करावी. समितीतील सर्व सदस्यांनी त्यांच्या गावपातळीवरील यंत्रणेला कामकाजात येणाऱ्या अडचणींबद्दल तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करावे. गाव पातळीवर न सुटलेले प्रश्न या समितीच्या बैठकीत चर्चेस घेऊन त्यांवर उपाययोजना करावी. पालक अधिकाऱ्यांनी गावस्तरावरील कामकाजाचा अहवाल या समितीच्या बैठकीत सादर करावा. तालुका स्तरीय समितीने आपल्या प्रत्येक बैठकीत मागील 15 दिवसांत झालेल्या कामकाजाचा आढावा घेऊन पुढील 15 दिवसांच्या कामांचे नियोजन करावे. तालुकास्तरीय समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष गाव भेटी देऊन, कामांना भेटी देऊन सल्ला, मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रणाचे कामकाज करावे.

❖ **जिल्हा पातळीवरील समन्वय समिती** -

सदर अभियानातील कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी आढावा घेणे, प्रशासकीय व तांत्रिक मार्गदर्शन करणे. प्रत्येक विभागाच्या कामकाजाचे परीक्षण करणे. दर 15 दिवसांनी बैठक घेऊन मागील 15 दिवसातील कामकाजाचा आढावा घेणे व पुढील 15 दिवसांच्या कामकाजाचे नियोजन करण्याची जबाबदारी या समितीची असेल.

**<u>जिल्हास्तरीय विकास व समन्वय समितीची रचना</u>**

मुख्य कार्यकारी अधिकारी - **अध्यक्ष**

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी - **सहअध्यक्ष**

प्रकल्प संचालक (ग्रामीण विकास यंत्रणा) - **सदस्य**

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म.बा.वि.) - **सदस्य**

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) - **सदस्य**

जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा.) - **सदस्य**

कार्यकारी अभियंता (बांध.१) - **सदस्य**

कार्यकारी अभियंता (बांध.२) - **सदस्य**

गट विकास अधिकारी (नरेगा) - **सदस्य**

कृषी विकास अधिकारी - **सदस्य**

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी - **सदस्य**

जिल्हा आरोग्य अधिकारी - **सदस्य**

शिक्षणाधिकारी (प्राथ.) - **सदस्य**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) - **सदस्य सचिव**




सदर समितीची बैठक दर 15 दिवसांतून आयोजित करावी. सदर समितीची बैठक आयोजित करण्याची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील. समितीतील सर्व सदस्यांनी तालुका पातळीवरील यंत्रणेला कामकाजात येणाऱ्या अडचणींबद्दल तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करावे. तालुका पातळीवर न सुटलेले प्रश्न या समितीच्या बैठकीत चर्चेस घेऊन त्यांवर उपाययोजना करावी. जिल्हास्तरीय समितीने आपल्या प्रत्येक बैठकीत मागील 15 दिवसांत झालेल्या कामकाजाचा आढावा घेऊन पुढील 15 दिवसांच्या कामांचे नियोजन करावे. जिल्हास्तरीय समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष तालुक्याला भेटी देऊन सल्ला, मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रणाचे कामकाज करावे.

**अभियानाचे मूल्यमापन -**

"माझा गाव, सुंदर गाव, समृद्ध गाव" अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतीने केलेल्या कामकाजाचे स्वतंत्रपणे जिल्हास्तर यंत्रणेकडून मूल्यमापन केले जाईल. मूल्यमापनासाठी द्यावयाचे गुणांकनाचे निकष या पत्रासोबतच्या विवरणपत्रात निश्चित करून देण्यात येत आहेत. अभियान अंतर्गत केल्या जाणाऱ्या कामांची माहिती ऑनलाइन

भरणे साठी जिल्हास्तरावरून गुगल स्प्रेडशीट उपलब्ध करून देण्यात येत आहे या स्प्रेडशीट मध्ये माहिती भरण्याची जबाबदारी संबंधित गावचे पालक अधिकारी व गटविकास अधिकारी यांची असेल.

**उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान -**

या अभियान अंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या व प्रत्येक तालुक्यातून प्रथम तीन क्रमांकावर येणाऱ्या ग्रामपंचायतींना तसेच जिल्हा स्तरावर प्रथम तीन क्रमांकावर येणाऱ्या ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेकडून मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल.

"माझा गाव, सुंदर गाव, समृद्ध गाव अभियानात सद्यस्थितीत जिल्ह्यातील ५५ ग्रामपंचायती सहभागी होत आहेत. हे अभियान या ग्रामपंचायतींकडून यशस्वी होईल अशी मला अपेक्षा आहे.

शुभेच्छांसह...!!

आपला

अजित पवार (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, बीड**